Rotary
रोटरी क्लब लातूर

फक्त पत्रिकाच नव्हे, तर विचारांचा एक मंच जो समाजाला बदलण्याची क्षमता ठेवतो...

# चक्रधर

अंक चौथा, नोव्हेंबर - २०२५

RID : 3132
CLUB NO. : 15520

UNITE FOR GOOD



२ नोव्हेंबर रोजी चार्टर डे साजरा केला. यावेळी चार्टर सदस्यांना सन्मानित करण्यात आले.



**रो. फ्रान्सेस्को ॲरेइझ्झो**
अध्यक्ष-रोटरी आंतरराष्ट्रीय
(२०२५-२६)



**रो. सुधीर लातुरे**
प्रांतपाल
- प्रांत ३१३२



१९ ऑक्टोबर रोजी दीपावलीनिमित्त तांडे आणि अनाथलयात किटचे वाटप करून दीपावली साजरी केली.



**रो. जकी खान कायमखानी**
अध्यक्ष : रोटरी क्लब लातूर
(२०२५-२६)



**रो. विश्वनाथ निगुडगे**
सचिव : रोटरी क्लब लातूर
(२०२५-२६)



१९ ऑक्टोबर रोजी माझं घर (अनाथालयात) येथील मुलांशी संवाद साधत दीपावली साजरी करण्यात आली.



रोटरीयन्सकरिता चार्टर डे स्पेशल दिवस असतो. आणि तो दिवस या केकने स्पेशल बनविला.



रोटरी क्लब लातूरमधील प्रोजेक्ट चेअरमन यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

**हिवाळ्याची सुरुवात:**
नोव्हेंबरमध्ये तापमान कमी होऊ लागते, सकाळ-संध्याकाळ थंडी वाढते.

**स्वच्छ आकाश आणि सुंदर हवामान:**
पावसाळा संपतो आणि हवा स्वच्छ व थंडगार होते.

**भ्रमंती आणि सहलींचा महिना :**
हे हवामान ना खूप गरम, ना खूप थंड — फिरण्यासाठी आदर्श काळ असतो.

# रोटरी क्लब लातूरची यंदाची दिवाळी तांडे, अनाथालयात उत्साहात साजरी; प्रकाश तिथे गरज आहे जिथे!

## आपुलकी अन् विश्वास पाहायला मिळाला : चेहऱ्यावरचे स्मित हास्य आनंद देऊन गेले

लातूर : दिवाळी – आनंद, प्रकाश आणि प्रेमाचा सण. या उत्सवात समाजातील सर्व घटकांना आनंद वाटावा, या भावनेतून रोटरी क्लब लातूरने एक आगळीवेगळी दिवाळी साजरी केली. रविवारी क्लबच्या कार्यकर्त्यांनी दोन तांड्यांमध्ये आणि एका अनाथालयात जाऊन दीपावली कीट आणि फराळ वाटप करून समाजातील वंचित घटकांपर्यंत आनंदाचा प्रकाश पोहोचवला.

नेहरू नगर तांडा येथे ७५ कीट, खरोळा रोड (रेणापूर) येथील तांडा येथे ५५ कुटुंबांना, तसेच 'माझं घर' अनाथालयात ७५ मुलांना फराळाचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमात सहभागी होताना अध्यक्ष जकी खान कायमखानी म्हणाले, छोट्या हातात फराळाचे डबे देताना मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले हसू – हाच या सणाचा खरा अर्थ आहे.

थंडीच्या सकाळी मुलांना गरम ब्लँकेट देताना त्यांच्या डोळ्यांत चमकणारा आनंद प्रत्येक रोटेरियनच्या मनात कायमचा कोरला गेला. मिठाईचा गोडवा आणि प्रेमाचा ओलावा या दोन भावनांनी ही दिवाळी अधिक प्रकाशमान झाली.

या तिन्ही ठिकाणी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकी खान कायमखानी, सचिव रो. विश्वनाथ निगुडगे, प्रकल्प संचालक डॉ. उत्तरेश्वर हेरकर, हर्षद राजूरकर, रामप्रसाद राठी, डॉ. दिलीप नागरगोजे, प्रा. डॉ. संदीपान जगदाळे, नरेश कोरे, प्रवीण रणदिवे, सुनील कोचेटा, अनिरुद्ध मुचलंबकर, राजकुमार गिरवलकर , आसीफ शेख, सतीश बोरा, मोहन परदेशी, आणि इतर रोटेरियन तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वर्षीची दिवाळी केवळ दिव्यांच्या उजेडाने नव्हे, तर सेवेच्या तेजाने उजळली – आणि हा प्रकाश प्रत्येक मनामनात पसरत राहो, हीच रोटरी क्लबची खरी कामना असल्याचे सचिव विश्वनाथ निगुडगे म्हणाले.

दिवाळीचा आनंद द्विगुणित तेव्हा होतो जेव्हा गरिबांना, वंचितांना यामध्ये सामावून घेत त्यांच्यासोबत बसून संवाद साधत फराळ वाटप करणे आणि सेवन केल्यानेच. त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य आणि आनंद सुखावून जातो.









### गरीब भागात सण, उत्सव साजरे करण्याचे फायदे

**१. मानवता आणि समानतेचा संदेश**
जेव्हा सक्षम लोक गरीब वस्त्यांमध्ये जाऊन दिवाळी साजरी करतात, तेव्हा समाजात हा संदेश जातो की आपण सर्वजण सारखेच आहोत कोणी मोठं, कोणी लहान नाही.

**२. मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि आत्मविश्वास**
जे मुले वर्षभर संघर्ष पाहतात, त्यांच्यासाठी दिवाळीत कोणी कपडे, मिठाई किंवा दिवे घेऊन आले. तर त्यांच्या चेहऱ्यावर येणारी स्मितरेषाच सर्वात मोठे पुण्य आहे.

**३. समाजातील सकारात्मकता आणि एकोप्याला चालना :**
जे लोक रोजच्या आयुष्यात ताण, गरिबी आणि संघर्ष अनुभवतात, त्यांच्या सोबत आपण दिवाळी साजरी केली. तर मनातला दुरावा कमी होतो आणि आपुलकी वाढते.

**४. दानधर्म आणि पुण्य**
गरिबाच्या घराचा दिवा पेटवणे मोठे पुण्य मानले जाते. धर्माचा खरा अर्थ म्हणजे – दु:खी लोकांचे दु:ख कमी करणे.

**५. समाजाला मिळणारी प्रेरणा -**
अशा उपक्रमांमुळे अनेक संस्था, क्लब, तरुण, विद्यार्थी प्रेरित होतात आणि समाजात मोठ्या प्रमाणावर सकारात्मक बदल घडतो. रोटरी क्लब लातूरच्या या उपक्रमांचेही सर्वत्र कौतुक होताना पाहावयास मिळत आहे.

# रोटरी : मानवतेसाठी आशेची किरण

आपल्या लातूर रोटरी क्लबमधील सर्व रोटेरियन मित्र आपापल्या परीने संपूर्ण योगदान देत आहेत. आज अनेक जण मला फोनवर विचारतात- आम्हाला रोटरीचं काम सांगा, आम्ही काहीतरी करायला तयार आहोत. ही गोष्ट माझ्यासाठी आणि आपल्या क्लबसाठी अभिमानाची आहे. विशेष आनंदाची बाब म्हणजे आपल्या नव्या मेंबर्सनीही पूर्ण मनापासून आणि उत्साहाने कामात सहभाग घेतला आहे. त्यांना रोटरी क्लबमध्ये येताना आणि समाजासाठी काहीतरी करताना विशेष आनंद व समाधान मिळत आहे.

खरं सांगायचं तर, रोटरीचा उद्देशच महासागरासारखा विशाल आहे.

रोटरी म्हणजे जगभरातील लोकांसाठी आशेचा दीपस्तंभ. येथे धर्म, जाती, भाषा किंवा विचारधारा यांचा काहीही संबंध नसताना सर्व जण खांद्याला खांदा लावून मन:पूर्वक सेवा करतात.

**रोटरी आणि फोर वे टेस्ट**

आज जगातील जवळपास प्रत्येक देशात रोटरीची कार्ये पोहोचली आहेत. रोटरीचे ध्येय आहे–

मानवतेची सेवा

पर्यावरणाचे रक्षण

सर्वसमावेशक प्रगती

तसेच राष्ट्रांमध्ये बंधुता व मैत्री निर्माण करणे. आपण भरलेल्या फीचा एक भाग थेट रोटरी इंटरनॅशनलकडे जातो आणि हा निधी जगाच्या कानाकोपऱ्यात मानवतेच्या मदतीसाठी वापरला जातो. म्हणूनच रोटरीमध्ये आपण मला काय मिळतंय याचा विचार करू नये; उलट आपण गर्वाने म्हणू शकतो की, आपण जगासाठी काही तरी देणं लागतोय, योगदान देतोय.

**सर्वात उत्तम मनुष्य कोण?**

जगात सर्वात उत्तम



मनुष्य

कोण?

ज्याच्याकडे अफाट ज्ञान आहे?

ज्याने असंख्य पुस्तके वाचली?

ज्याच्याकडे सत्ता–सामर्थ्य आहे?

नाही!

परमात्म्याच्या नजरेत मोठा तोच– जो मानवतेसाठी काम करतो, जगासाठी काम करतो, पर्यावरणासाठी झटतो. आणि हेच आपण रोटेरियन करत आहोत.

खरं तर आपलं कार्य आपल्या नियतीवर अवलंबून आहे. जर आपण फक्त लोकांशी संबंध टिकवण्यासाठी किंवा प्रतिष्ठेसाठी काम करत असू, तर त्यात टिकाव राहत नाही. परंतु आपण सेवा ही ईश्वरसेवा या भावनेने काम केले, तर आपल्याला पुण्यही मिळतं आणि ऊर्जा, प्रेरणाही.

**मतभेद असले तरी मनभेद नसावेत**

आपल्यापैकी प्रत्येकाचे मत वेगळे असू शकते. घरातही पती–पत्नी, मुले आणि नातेवाईक यांच्या मतांमध्ये फरक असतो. परंतु त्याने एकमेकांवरील प्रेम कमी होत नाही.

अगदी तसेच रोटरी क्लबमध्येही काहीवेळा मतभेद होतात, पण मनभेद होत नाहीत.

कारण आपले उद्दिष्ट सामाईक आहे–

मानवता, पर्यावरण आणि समाजासाठी योगदान देणे.

**रोटेरियन्सना मन:पूर्वक आभार**

आज मी सर्व रोटेरियन्सचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. आपण या क्लबशी जोडून आपल्या आयुष्यातील मौल्यवान वेळ, ऊर्जा आणि श्रम समाजकार्यासाठी देत आहात, हीच आपल्या जीवनाची खरी कमाई आहे. रोटरी ही केवळ संस्था नाही, ती सेवा, सद्भावना आणि मानवतेची जागतिक चळवळ आहे. आपल्या प्रत्येक सदस्यामुळे लातूर रोटरी क्लब आज अधिक मजबूत, सक्षम आणि प्रभावी बनला आहे.

धन्यवाद.

– रो. जकी खान कायमखानी

अध्यक्ष, रोटरी क्लब लातूर

# रोटरी क्लब लातूरतर्फे दिवाळी फराळ वाटपाची काही क्षणचित्रे....



















































# रोटरी क्लब लातूरचा स्थापना दिवस उत्साहात साजरा







लातूर : रोटरी क्लब लातूर च्या स्थापनेला ५५ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून शुक्रवार, ७ नोव्हेंबर रोजी हॉटेल ॲम्बेसी, अंबाजोगाई रोड लातूर येथील सभागृहात स्थापना दिवसात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी क्लबचे अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी होते. कार्यक्रमाची सुरुवात फोर वे टेस्ट वाचनाने झाल्यानंतर प्रथमतः क्लबचे चार्टर सदस्य रो. डॉ. नंदकिशोरजी अग्रवाल यांचा सत्कार करण्यात आला. तद्नंतर क्लबचे अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी व क्लबने यावर्षी केलेल्या कामांचा अहवाल सांगून पुढील कालावधीत करावयांच्या कामांसाठी सर्व सदस्यांचा सहयोग अपेक्षित असल्याचे नमूद केले.



यावेळी सदस्यांचे कॅराओके गायन झाले. यामध्ये रो. रणदिवे, रो. होळीकर, कु. भाग्यश्री जोशी, कु. जगदाळे, सौ. होळीकर यांनी सहभाग नोंदविला. रो. मोहनभाई परदेशी यांनी सॅटेलाईट क्लबला एक लाख रूपयांची भरीव देणगी प्रदान केल्याबद्दल त्यांचा सत्कार केला. क्लबतर्फे चालविण्यात येत असलेल्या मोफत अन्नसेवा प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती रो. महेंद्र जोशी यांनी देऊन यामध्ये सर्व सदस्यांनी आपला सहभाग तर नोंदवावाच, त्याचबरोबर आपल्या परिचयातील सर्वांपर्यंत प्रकल्पाची माहिती पोहोचवावी आणि हा प्रकल्प अजून चांगला कसा चालेल याबाबत प्रयत्न करावेत,असे आवाहन केले. रो. राज धूत यांनी क्लबने गत पन्नास वर्षांत केलेल्या कामांचा थोडक्यात आढावा घेऊन क्लबमार्फत यापुढेही समाजोपयोगी कामे होत राहतील, त्यामध्ये सर्व सदस्यांनी आपला सहभाग नोंदविण्याबाबत आवाहन केले. माजी प्रांतपाल रो. हरिप्रसाद सोमाणी यांनी क्लबमार्फत घेण्यात यावयाच्या ग्लोबल ग्रांट प्रकल्पाबाबत माहिती दिली. क्लबचे सदस्य रो. श्री विश्वजितजी कदम यांनी अन्नसेवा प्रकल्पास रु. १ लाखाची देणगी जाहीर केली. त्याबद्दल रोटरी वेल्फेअर ट्रस्टचे अध्यक्ष रो. हरिप्रसाद सोमाणी यांच्या हस्ते सत्कार करून प्रकल्पास उदारहस्ते मदत केल्याबद्दल आभार मानण्यात आले.

प्रसिद्ध पपेट शोकर्ते राहुल भालेराव यांनी १ तासाचा पपेट शो सादर केला. त्यांनी अत्यंत अवघड असा पपेट शो सादर करुन उपस्थित रोटेरियन्सचे मनोरंजन केले. क्लबचे सचिव रो. विश्वनाथ निगुडगे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रो. डॉ. गोपाल बाहेती, रो. प्रवीण होळीकर, रो. प्रवीण रणदिवे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन रो. प्रवीण रणदिवे यांनी केले.





लोकमत

## रोटरी क्लबचा स्थापना दिवस उपक्रमांनी साजरा

**लातूर :** येथील रोटरी क्लब लातूरच्या स्थापनेला ५५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त शुक्रवारी स्थापना दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी क्लबचे अध्यक्ष जकी खान कायमखानी होते. क्लबचे चार्टर सदस्य ॲड. नंदकिशोर अग्रवाल, मोहनभाई परदेशी यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. क्लबचे अध्यक्ष कायमखानी यांनी कामाच्या अहवालाचे वाचन केले. यावेळी रणदिवे, होळीकर, भाग्यश्री जोशी, जगदाळे, होळीकर यांनी कॅराओके गायन केले. क्लबच्या मोफत अन्नसेवा प्रकल्पाबाबत महेंद्र जोशी यांनी माहिती दिली. राज धूत यांनी कामाचा आढावा घेतला. हरिप्रसाद सोमाणी यांनी ग्लोबल ग्रांट प्रकल्पाबाबत माहिती दिली. क्लबचे सदस्य विश्वजित कदम यांनी अन्नसेवा प्रकल्पास मदत केली. राहुल भालेराव यांनी पपेट शो सादर केला. प्रवीण रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले तर विश्वनाथ निगुडगे यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी डॉ. गोपाल बाहेती, प्रवीण होळीकर, प्रवीण रणदिवे यांनी परिश्रम घेतले.

Hello Latur
Page No. 3 Oct 08, 2025
Powered by: erelego.com




प्रसिद्ध पपेट शोकर्ते राहुल भालेराव यांनी रोटरीयन्सची मने जिंकली. पपेट शोचे सादरीकरण अत्यंत सुंदर झाल्याची भावना यावेळी रोटरीयन्सनी व्यक्त केली.

# परवरिश एक कला - पैरेंटिंग का नया दृष्टिकोण




हर माता-पिता का सपना होता है कि उनका बच्चा जीवन में सफल, संस्कारी और खुश रहे। लेकिन आज के बदलते समय में यह समझना ज़रूरी है कि बच्चे वही नहीं हैं जो हम अपने बचपन में थे। तकनीक, सूचना और प्रतिस्पर्धा के इस युग में बच्चों का सोचने, सीखने और महसूस करने का तरीका बदल चुका है।



अब पैरेंटिंग केवल अनुशासन की कला नहीं, बल्कि बच्चे के मन और मस्तिष्क को समझने की एक संवेदनशील यात्रा है।

**समझ बनाम नियंत्रण**

कभी पैरेंटिंग का मतलब था नियमों से चलना और आज्ञा मानना। लेकिन आज का बच्चा सवाल पुछता है, सोचता है और आत्मसम्मान को महत्व देता है। वह डाँट से नहीं, संवाद से बढ़ता है। अगर हम उसे केवल आदेश देंगे, तो वह असहमति से जवाब देगा; लेकिन अगर हम उसे समझेंगे, तो वह सहयोग से साथ देगा। आज की पैरेंटिंग में "Control' की जगह "Connection' की ज़रूरत है। हर बच्चा अनोखा है – Multiple Intelligence Theory अक्सर माता–पिता यह मानते हैं कि अच्छे अंक = बुद्धिमान बच्चा। लेकिन Harvard University के प्रोफेसर Howard Gardner Has Multiple Intelligence Theory ने दुनिया को एक नया दृष्टिकोण दिया। उनके अनुसार, बुद्धिमत्ता केवल एक नहीं, बल्कि कई रूपों में होती है जैसे Logical, Linguistic, Musical, Bodily, Intrapersonal, Interpersonal, Visual Am¡a Naturalistic Intelligence&

> पैरेंटिंग का उद्देश बच्चे को किसी और जैसा बनाना नहीं,बल्कि उसे उसकी अपनी पहचान में उत्कृष्ट बनाना है।

किसी बच्चे में गणितीय समझ बहुत तेज़ हो सकती है, तो किसी और में संगीत या सहानुभूति की क्षमता असाधारण होती है। अगर माता–पिता इन विविध बुद्धिमत्ताओं को पहचान लें, तो बच्चे को उसकी natural strength के अनुसार मार्गदर्शन दिया जा सकता है।

पैरेंटिंग का उद्देश्य बच्चे को किसी और जैसा बनाना नहीं,बल्कि उसे उसकी अपनी पहचान में उत्कृष्ट बनाना है। हर बच्चे की अपनी Learning Style होती है

हर बच्चा सीखता है, पर एक ही तरीके से नहीं। कोई visual learner होता है जो देखकर समझता है, कोई auditory learner सुनकर सीखता है, और कोई kinesthetic learner प्रैक्टिस करके अनुभव से समझता है। कई बार हम कहते हैं, यह बच्चा ध्यान नहीं देता, जबकि असल में वह अपने लिए सही माध्यम नहीं पा रहा होता। अगर हम उसकी learning style को पहचान लें, तो शिक्षा संघर्ष नहीं, आनंद बन जाती है Learning style को समझना, पैरेंटिंग में empathy का पहला कदम है।

**संवाद ही समाधान है**

कई बार बच्चे का गुस्सा, चुप रहना या विद्रोह उसकी समस्या नहीं, बल्कि उसकी अभिव्यक्ति का तरिका होता है। जब हम उसे सुनते हैं, बिना जज किए, तो वह अपने भीतर की भावनाएँ व्यक्त करने लगता है। और यही emotional bonding उसके विकास का सबसे मजबूत आधार बनती है। संवाद का अर्थ केवल बोलना नहीं,बल्कि सुनना, महसूस करना और स्वीकार करना भी है।

Parenting 2.0 – समझ की दिशा में एक कदम

आज की पैरेंटिंग को सुधार से ज़्यादा समझ की ज़रूरत है। बच्चों को हर समय सिखाने से पहले हमें उन्हें देखने, सुनने और महसूस करने की ज़रूरत है।

**हर दिन कुछ मिनट नो-इंस्ट्रक्शन टाइम रखिए -**

जहाँ आप केवल बच्चे की बात सुनें। उसके सपने, डर और छोटी खुशियाँ – यही आपके रिश्ते की नींव हैं।

**बच्चों को सिखाने से पहले, उन्हें समझिए** - पैरेंटिंग कोई पाठ्यक्रम नहीं, बल्कि एक जीवनभर चलने वाली सीख है। हर दिन हम अपने बच्चे से धैर्य, प्रेम और जागरूकता सीखते हैं। इस Children's Day पर अपने बच्चे से बस एक वादा कीजिए!

मैं तुम्हें तुलना से नहीं, समझ से देखूँगा। मैं तुम्हें अपनी तरह नहीं, तुम्हारी तरह बनने दूँगा। यही सच्ची पैरेंटिंग है, जहाँ बच्चे के अंदर का potential खिलता है, दबता नहीं।

**Rtn. Dr. Asif Shaikh**
Mind Trainer & Parenting Coach & Founder - Mind Nurture Expert author of Parvarish Ek Kala.
9975124427

लोकमत



रोटरी क्लबच्या वतीने तांड्यावर जाऊन दिवाळी साजरी करण्यात आली. रोटरी क्लबच्या सेवेच्या प्रकाशात दिवाळी साजरी झाली. यावेळी रोटरीच्या वतीने नेहरू नगर तांडा येथे किटचे वाटप करण्यात आले.

## रोटरी क्लबकडून 'सेवेच्या प्रकाशात' दिवाळी साजरी

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : दिवाळीच्या मंगलमय पर्वात समाजातील वंचित घटकांना आनंद वाटावा, या उदात्त भावनेतून रोटरी क्लब लातूरने यंदाची दिवाळी आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी केली. क्लबच्या सदस्यांनी दोन तांड्यांमध्ये आणि एका अनाथालयात दीपावली किट आणि फराळ वाटप करून 'सेवेच्या प्रकाशात' आनंदाचे किरण पोहोचवले.

> तांड्यावर दीपावली किट आणि फराळाचे वाटप; माझं घर प्रकल्पामध्येही दिवाळी साजरी.

रविवारी झालेल्या या उपक्रमात नेहरू नगर तांडा येथे ७५ किट, खरोळा रोड (रेणापूर) येथील तांडा येथे ५५ कुटुंबांना, तसेच 'माझं घर' अनाथालयात ७५ मुलांना फराळाचे वाटप करण्यात आले. सोबतच मुलांना गरम ब्लँकेटही देण्यात आले.

यावेळी क्लबचे अध्यक्ष जकी खान कायमखानी म्हणाले, "छोट्या हातात फराळाचे डबे देताना मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले हसू हाच या सणाचा खरा अर्थ आहे." सचिव विश्वनाथ निगुडगे यांनी सांगितले की, "या वर्षीची दिवाळी केवळ दिव्यांच्या उजेडाने नव्हे, तर सेवेच्या तेजाने उजळली. हा प्रकाश प्रत्येक मनामनात पसरत राहो, हीच रोटरी क्लबची खरी कामना आहे."

या उपक्रमात अध्यक्ष, सचिव आणि प्रकल्प संचालक डॉ. उत्तरेश्वर हेरकर यांच्यासह अनेक रोटेरियन सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिठाईचा गोडवा आणि प्रेमाचा ओलावा या दोन भावनांनी ही दिवाळी अधिक प्रकाशमान झाली.

Hello Latur
Page No. 2 Oct 31, 2025
Powered by: erelego.com

# एक आगळी वेगळी दिवाळी

दरवर्षीच दिवाळीचा सण येतो त्यावेळी सर्वत्र प्रकाशांचा दिव्यांचा झगमगाट अनुभवायला मिळतो. मात्र समाजातल्या काही व्यक्तींकडे, परिवारांकडे हा झगमगाट कमी प्रमाणात असतो. त्यामुळे त्यांना सुद्धा दिवाळीच्या आनंदात सहभागी होता यावे म्हणून यावर्षी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी साहेब यांच्या संकल्पनेतून वंचितांना दिवाळीचा आनंद मिळावा या दृष्टीने नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार ही आगळी-वेगळी दीपावली रोटरी क्लबच्या वतीने तीन ठिकाणी साजरी करण्यात आली.



१. नेहरूनगर तांडा तालुका रेणापूर जिल्हा लातूर या वस्तीवर साधारण ७५ कुटुंबांना फराळाचे किट देऊन दीपावलीच्या आनंदात सहभागी करून घेण्यात आले.
२. खरोळा तांडा तालुका रेणापूर जिल्हा लातूर या ठिकाणी साधारण ६० कुटुंबीयांना दिवाळी फराळाचे किट त्याचबरोबर अंधकाराचा नायनाट करण्याचे प्रतीक असणाऱ्या सुशोभित पणत्या देऊन दिवाळी साजरी करण्यात आली.
३. 'माझं घर' या श्रीयुत झरे या थोर समाजसेवकांच्या औसा जवळील अनाथालयात तर सर्वात उत्तम रीतीने दीपावलीचा आनंद साजरा करण्यात आला. त्या ठिकाणी ७५ च्या वर अनाथ मुला-मुलींसाठी उबदार ब्लँकेट्सचे वाटप रो.जकी भाई यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच दिवाळीच्या फराळाचा आनंद त्यांना देण्यात आला. त्यासाठीचे किट या सर्व मुलांना वाटण्यात आले. त्या ठिकाणच्या अनाथ मुलांनी त्यांच्या कलागुणांना आमच्यासमोर वाव दिला. मंत्रमुग्ध करणारी त्यांची कला पाहून सर्व उपस्थित रोटरीयन्स यांचे डोळे पाणावले.

या तीनही प्रोजेक्टसाठी रोटरी क्लब लातूरचे वरिष्ठ सदस्य रो. मोहनजी परदेशी, रो. डॉ. उत्तरेश्वर हेरकर, रो. रामप्रसादजी राठी, उपप्राचार्य नागरगोजे सर रो. जगदाळे सर, रो. नरेशजी कोरे व इतर अनेक रोटेरियन्स उपस्थित होते. वंचितांना आपण क्लबच्या माध्यमातून दिवाळीच्या आनंदात सहभागी करू शकलो. या आनंदाचे मोल करता येणे शक्य नाही. या तीनही प्रोजेक्टसाठी सर्वतोपरी मदत केल्याबद्दल क्लबचे अध्यक्ष आदरणीय जकी भाई यांचे सर्वांनी मनापासून कौतुक केले आहे.

**- रो. हर्षद राजूरकर.**

# पूरग्रस्तांसाठी रोटरी क्लबचा हातभार




लातूर : रोटरी क्लब लातूर तर्फे अतिवृष्टीग्रस्त भागातील शेतकऱ्यांना धान्य कीटसाठी निधी उभारण्याचे आवाहन करण्यात आला होते. या आवाहनाला प्रतिसाद देत अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी ५००० रूपये, रो. विश्वनाथ निगुडगे ५०००, रो. हरिप्रसाद सोमानी ५०००, रो. महेंद्र जोशी ७०००, रो. श्रीराम देशपांडे ५०००, रो. नानिक जोधवानी २०००, रो. ब्रह्मकुमार सुवर्णकार २०००, रो. बस्वराज उटगे ५०००, रो. सुनील कोचेटा ५००० रूपये निधी जमा केला. रोटरीयन्सनी शेतकऱ्यांसाठी उभारलेल्या या निधीबद्दल अध्यक्ष जकी खान कायमखानी यांनी आभार मानले.

लातूर शहरानजीकच्या मळवटी रोड परिसरात आयोजित कार्यक्रमात शेतकऱ्यांना अन्नधान्य कीटचे वाटप करण्यात आले. रो. हरिप्रसाद सोमाणी, डॉ. ममता कुलकर्णी, गुणवंत बिरादार आदींच्या हस्ते शेतकऱ्यांना कीट देण्यात आले. शेतकऱ्यांप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता एक कर्तव्यभावना असल्याचे रोटरीयन्स म्हणाले.

आसमानी आणि सुलतानी संकटांनी शेतकरी सदैव घेरला जातो. यंदा मात्र अतिवृष्टी झाल्याने मोठा फटका शेतकऱ्यांना बसला. शेतीचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे रोटरीयन्सनी आपली कर्तव्यभावना व्यक्त करीत मदतीचा हात पुढे केला.

